# सम्राट अशोक व धम्म धोरण

**प्रा. डॉ. अनंत रिंढे**
इतिहास विभाग प्रमुख
यशवंत महाविद्यालय, सेलू

**सारांश (Abstract) :**

भारतीय इतिहासात मौर्य वंशाच्या स्थापनेने नव्या युगाचा प्रारंभ झाल्याचे दिसून येते. जगाच्या इतिहासात थोर हे विशेषण ज्या बोटावर मोजण्याइतपत सम्राटांना मिळाले त्यामध्ये सम्राट अशोकाचे नाव अग्रभागी दिसते. सम्राट अशोकाची कारकीर्द ही भारताच्या इतिहासातील सर्वात तेजस्वी पान आहे. सम्राट अशोकामुळे तत्कालीन सांस्कृतिक जगात भारताला स्थान मिळाल्याचे दिसून येते. तलवार हे सर्व समस्यांच्या निराकरणाचे अंतिम साधन म्हणून मान्यता पावले असताना ती तलवार म्यान करुन धर्मविजयाव्दारे संपूर्ण जगाला बंधुभाव, अहिंसा, करुणा, प्रेम यांचा संदेश देणारे सम्राट अशोक हे भारतीय तत्त्वज्ञानाच्या मुशीतून तयार झालेले अलौकिक रसायन आहे. सम्राट अशोकाच्या तेराव्या शिलालेखामध्ये कलिंग युध्दाची माहिती मिळते. या युध्दानंतर त्यांनी तलवार म्यानमध्ये घातली व कोणतेही युध्द केले नाही. कलिंगच्या युध्दानंतर त्यांनी धम्मधोरण स्वीकारले. त्यांनी धम्म धोरण स्वीकारल्यानंतर त्यांच्या धम्म धोरणाचा त्यांच्या अंतर्गत व विदेशी धोरणावर जो परिणाम झाला त्याचे विश्लेषण प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आले आहे.

**बिज संज्ञा (Key Words) :**

कलिंगचे युध्द, कलिंग युध्दानंतर सम्राट अशोकाचे धर्मपरिवर्तन, धम्म धोरणामुळे सम्राट अशोकाच्या अंतर्गत व विदेशी धोरणात झालेला बदल.

**संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of Research Paper):**

1. कलिंगच्या युध्दाचा सम्राट अशोकावर झालेल्या परिणामाची चर्चा करणे.
2. सम्राट अशोकाने धम्म धोरण स्वीकारल्यानंतर त्यांच्या अंतर्गत धोरणात झालेल्या बदलाचे विश्लेषण करणे.
3. सम्राट अशोकाने धर्मांतर केल्यानंतर त्यांच्या परराष्ट्र धोरणावर झालेल्या बदलाची चर्चा करणे.

**प्रस्तावना (Intorduction) :**

सम्राट अशोक मौर्य यांचा कालखंड हा भारतीय इतिहासातील एक महत्त्वाचे पर्व मानले जाते. त्यांनी अधिकार पदावर आल्यानंतर कलिंग प्रांतावर आक्रमण

केले. कलिंगच्या युध्दात विजय मिळवूनही हा विजय त्यांना निरर्थक वाटू लागला. कलिंगच्या युध्दात झालेल्या नरसंहारामुळे त्यांना पश्चाताप होऊन त्यांनी यापुढे कोणतेही युध्द न करण्याचा निर्णय घेऊन धम्म धोरण स्वीकारले. त्यांच्या धम्म धोरणाची तत्त्वे लोकांनी आचारणात आणावी, यासाठी ही तत्त्वे त्यांनी स्तंभलेखावर व शिलालेखावर कोरुन ठेवल्याचे दिसून येते. त्यांनी स्वीकारलेल्या धम्म धोरणाचा परिणाम त्यांच्या अंतर्गत व विदेशी धोरणावर झालेला दिसून येतो.

**कलिंगचे युध्द :**

सम्राट अशोकाच्या निरनिराळया ऐतिहासिक साधनांच्या आधारे असे दिसून येते की अशोकाने त्यांच्या शासनाच्या 13 व्या वर्षापर्यंत त्यांच्या पूर्वजांच्या साम्राज्य विस्तार धोरणाचा तसेच विदेशांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याच्या धोरणाचाच अंगिकार केल्याचे दिसते. सम्राट अशोकाच्या पूर्व सीमेवरील कलिंगचे राज्य सोडले तर जवळपास संपूर्ण भारत त्यांच्या साम्राज्यात मोडत होता. त्यामुळे मौर्य साम्राज्याला पूर्णपणे सुरक्षित करण्यासाठी त्यांनी कलिंग मोहीम आखली होती. कलिंग राज्याच्या समुद्रकिनाऱ्यावरील बंदरातून विदेशांशी व्यापार चालत होता. हा व्यापार अत्यंत समृध्द होता. कलिंगसारख्या सीमावर्ती शक्तीशाली राज्याला नष्ट करुन पूर्व समुद्रकिनारा ताब्यात घेण्यासाठी सम्राट अशोकाने कलिंगवर आक्रमण केले.

कलिंग प्रांताचा राजा खारवेल व सम्राट अशोक मौर्य यांच्या सैन्यामध्ये कलिंग या ठिकाणी जे युध्द झाले या युध्दात सम्राट अशोकाचा विजय झाला. कलिंगच्या युध्दात विजयी होऊनही या युध्दात जो रक्तपात व नरसंहार झाला त्यामुळे सम्राट अशोकाला पश्चाताप होऊन त्यांनी ह्यानंतर युध्द न करण्याचा निर्णय घेतला.

**धम्म धोरण :**

कलिंगवरील विजय हा मगधच्या व भारताच्या इतिहासातील अत्यंत महत्वाची घटना होती. या विजयानंतर सम्राट अशोक यांनी युध्द न करण्याचा निर्णय घेतला होता. कलिंगच्या युध्दामध्ये जो नरसंहार झाला त्यामुळे सम्राट अशोकाचे हृदयपरिवर्तन होऊन त्यांनी धम्म धोरण स्वीकारल्याचे त्यांच्या तेराव्या शिलालेखामध्ये दिसते. अशोकाने धम्म धोरण स्वीकारल्यानंतर एका नव्या युगाचा आरंभ झाला. हे युग



□□□□□□ □□□□□□□

शांततेचे व सामाजिक प्रगतीचे होते. सम्राट अशोकाने जे धम्म धोरण स्वीकारले त्याचा परिणाम त्यांच्या अंतर्गत व विदेशी धोरणावर झालेला दिसून येतो.

**अंतर्गत धोरणात बदल :**

सम्राट अशोक यांनी धम्म धोरण स्वीकारल्यानंतर त्यांच्या अंतर्गत धोरणात बदल झालेला दिसून येतो. सम्राट अशोकाचा भर तत्त्वज्ञानावर नव्हता तर नैतिक आचरणावर होता. वडिलधाऱ्या माणसांविषयी व गुरुजनांबद्दल आदर बाळगा, ब्राम्हण, श्रमण यांच्याविषयी आदर ठेवा, कनिष्ठांविषयी सहानुभूतीने वागा, नोकरचाकरांशी माणूसकीने वागा अशा पध्दतीचे आचरण जनतेनी नेहमी ठेवावे यासाठी त्यांनी सर्व स्तंभावर हे उपदेश कोरुन ठेवले आहे. त्यांनी स्वत: मांसाहार करणे बंद केले, शिकार करणे सोडले व यज्ञामध्ये जो पशुंचा बळी दिला जात होता त्यावर पूर्णत: बंदी घातली. त्यांनी मानवाच्या कल्याणासाठी काही उपक्रम राबविलेले दिसून येतात. माणसांसाठी व पशुंसाठी राज्यात नवीन दवाखाने सुरु करुन औषधी वनस्पतींच्या बागा तयार केल्या. प्रवाशी व व्यापाऱ्यांना त्यांच्या सोईसाठी रस्ते तयार करुन रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावली. प्रवाशांना पिण्याच्या पाण्याची व जेवणाची व्यवस्था व्हावी यासाठी रस्त्याने ठराविक अंतरावर विहीर खोदून पाणपोया, अन्नछत्रालये सुरु केली.

**विदेशी धोरणात झालेला बदल :**

सम्राट अशोक यांनी धम्म धोरण केवळ भारतातच नव्हे तर श्रीलंका, नेपाळ व मध्य आशियापर्यंत पोहचविल्याचे दिसून येते. त्यांनी स्वत:चा मुलगा महेंद्र आणि मुलगी संघमित्रा यांना सिलोनमध्ये व नेपाळमध्ये पाठवून बौध्द धर्माचा प्रसार केला होता.

**निष्कर्ष (Conclusion) :**

कलिंग युध्द ही केवळ भारताच्या नव्हे तर जगाच्या इतिहासातील एक क्रांतीकारक घटना मानली जाते. या युध्दामुळेच अशोक मौर्य यांच्या विचारात आणि आचारात क्रांतीकारक बदल झालेला दिसून येतो. कलिंग युध्दामध्ये जो नरसंहार व रक्तपात झाला होता त्यामुळे सम्राट अशोक मौर्य यांना दु:ख झाले आणि त्यांनी धम्म धोरण स्वीकारले. त्यांच्या धम्म धोरणाचा त्यांच्या अंतर्गत धोरणावर परिणाम झालेला दिसून येतो. सम्राट अशोक मौर्य यांचे धार्मिक धोरण हे मानवतावादी होते हे त्यांच्या स्तंभलेखांवरुन व शिलालेखांवरुन स्पष्ट होते. त्यांच्या धम्म धोरणामध्ये कुठल्याही प्रकारची जातीयता दिसून येत नाही तर सर्वधर्मसमभाव हे तत्त्व दिसून

येते. त्यांनी धम्म धोरण स्वीकारल्यानंतर कोणतेही युध्द न करता धम्म धोरणाचा अंगिकार करुनच आपले साम्राज्य टिकवून ठेवल्याचे संपूर्ण जगाला दाखवून दिल्याचे दिसून येते. सम्राट अशोक यांनी त्यांचे धम्म धोरण केवळ भारतातच नव्हे तर श्रीलंका, नेपाळ, मध्य आशियापर्यंत पोहचविले. त्यामुळे त्यांच्या धम्म धोरणामुळे विदेशामध्ये सुध्दा भारताची छाप निर्माण झाल्याचे दिसून येते.

## संदर्भग्रंथ सूची :

आठल्ये, वि. अ. *प्राचीन व मध्ययुगीन भारत.* नागपूर : सर साहित्य केंद्र.

कोलारकर, श. गो. *भारताचा इतिहास.* नागपूर : श्री मंगेश प्रकाशन.

झा, डि. एन. *प्राचीन भारत का इतिहास.* दिल्ली विश्वविद्यालय : हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय.

मार्डीकर, मदन. *प्राचीन भारताचा इतिहास.* औरंगाबाद : विद्या बुक्स पब्लिशर्स.

रायचौधुरी, हेमचंद्र. *प्राचीन भारताचा राजकीय इतिहास.* पुणे : डायमंड पब्लिकेशन.